Annexure-VII



मे. यशवंत शुगर आणि पॉवर प्रायव्हेट लिमिटेड, नागेवाडी, तालुका-खानापूर, जिल्हा-सांगली महाराष्ट्र यांच्या कार्यरत साखर कारखान्यात प्रस्तावित ऊस गाळप विस्तारिकरण क्षमता २,५०० टन प्रतिदिन ते ८,००० टन प्रतिदिन, नविन ४०.० मेगावॅट सहविद्युत प्रकल्पाची स्थापना व नविन ११० केएलपीडी आसवणी क्षमता, ११० केएलपीडी रेक्टीफाईड स्पिरिटचे उत्पादन करण्यासाठी / ११० केएलपीडी इ.एन.ए./ १०५ केएलपीडी इथेनॉल आधारित सी / बी हेवी मोलॅसिस / ऊसाचा रस (शुगर केन ज्यूस) / एकवटलेला ऊसाचा रस (Concentrated Juice) सायरप / धान्य (ग्रेन्स) प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत

---

मे. यशवंत शुगर आणि पॉवर प्रायव्हेट लिमिटेड, नागेवाडी, तालुका-खानापूर, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र यांच्या कार्यरत साखर कारखान्यात प्रस्तावित ऊस गाळप विस्तारिकरण क्षमता प्रकल्प २,५०० टन प्रतिदिन ते ८.००० टन प्रतिदिन, नविन ४०.० मेगावॅट सहविद्युत प्रकल्पाची स्थापना व नविन ११० केएलपीडी आसवणी क्षमता, ११० केएलपीडी रेक्टीफाईड स्पिरिटचे उत्पादन करण्यासाठी / ११० केएलपीडी इ.एन.ए./ १०५ केएलपीडी इथेनॉल आधारित सी / बी हेवी मोलॅसिस / ऊसाचा रस (शुगर केन ज्यूस) / एकवटलेला ऊसाचा रस (Concentrated Juice) सायरप / धान्य (ग्रेन्स) प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी दुपारी १२.३० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ०५/२०२१ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०/२०-एफटीएस-०१३५, दिनांक २०-०१-२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

१) डॉ. अभिजीत चौधरी, (भाप्रसे) - अध्यक्ष
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सांगली.

२) श्री. रविंद्र आंधळे, - सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर.

३) नवनाथ अवताडे, - आयोजक
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली.

श्री नवनाथ अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या ०९-१२-२०२० व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या १५-१२-२०२० च्या निर्देशांनुसार सदरहू जनसुनावणी उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांनी आयोजित केलेली आहे. त्यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दाराजवळ सर्वांसाठी करण्यात आलेला असून बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीचे मा. अध्यक्ष तथा जिल्हादंडाधिकारी, सांगली जिल्हा, सांगली, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर, पर्यावरणविषयक काम करणा-या संस्थेचे प्रतिनिधी, पत्रकार, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक, यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, यांनी असे सांगितले की मे. यशवंत शुगर आणि पॉवर प्रायव्हेट लिमिटेड, नागेवाडी, तालुका-खानापूर, जिल्हा-सांगली, यांच्या सद्या कार्यरत साखर कारखान्यात प्रस्तावित ऊस गाळप विस्तारिकरण क्षमता २,५०० टन प्रतिदिन ते ८,००० टन प्रतिदिन, नविन ४० मेगावॅट सहविद्युत प्रकल्पाची स्थापना व नविन ११० केएलपीडी आसवणी क्षमता, ११० केएलपीडी रेक्टीफाईड स्पिरिटचे उत्पादन करण्यासाठी / ११० केएलपीडी इ.एन.ए./ १०५ केएलपीडी इथेनॉल आधारित सी / बी हेवी मोलॅसिस / ऊसाचा रस (शुगर केन ज्यूस) / एकवटलेला ऊसाचा रस (Concentrated Juice) सायरप / धान्य (ग्रेन्स) प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज म.प्र.नि. मंडळास प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून जरी सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग अ ५ (जी) व

५ (जी) मध्ये मोडत असल्याने त्यास केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक, यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २७-११-२०२० रोजी सादर केला व त्यास अर्जास केंद्र शासनाने ऑनलाईन मंजूरी ०९ डिसेंबर, २०२० रोजी प्रदान केली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, सांगली यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय दैनिक वृत्तपत्र द टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक २५-१२-२०२० रोजी सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सूचना देण्यात आलेली होती. त्यात नियोजित प्रकल्पाच्या परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक काम करणा-या संस्था, प्रकल्पामुळे प्रभावित/विस्तापित होणारे रहिवासी यांना उपरोक्त प्रकल्पाबाबतच्या पर्यावरणविषयक काही आक्षेप, हरकती, सूचना, टीकाटिप्पणी असल्यास ते लेखी/ईमेल व्दारे ३० दिवसांच्या आत नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते. मात्र स्थानिक मराठी वृत्तपत्र लोकमत यात छपाईच्या त्रुटीमुळे अनवधाने प्रसिध्द झाल्याने फक्त मराठी शुध्दीपत्र स्थानिक मराठी वृत्तपत्र लोकमत यात २७-१२-२०२० रोजी परत प्रसिध्द करण्यात आलेले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत नागरिकांच्या माहितीसाठी शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरण बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर-४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-सांगली, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, सांगली, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, सांगली, तहसीलदार, तहसील कार्यालय- खानापूर , जिल्हा-सांगली, ग्रामसेवक,

ग्रामपंचायत कार्यालय, नागेवाडी, गार्डी, चिखलहोळ, साळशिंगे, भाग्यनगर, घानवड, हिंगणगादे, तालुका-खानापूर, जिल्हा-सांगली, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नविन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेले होते.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०२० च्या कार्यालयीन टिप्पणीनुसार कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार उपस्थितांनी बैठकीत मुखपट्टी, दोन व्यक्तींमध्ये अंतर पाळणे, सॅनिटायझरचा वापर बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, सांगली यांच्याकडे काही सूचना / आक्षेप हे नोंदविण्यात आलेले आहेत.

आयोजक, यांनी आजच्या जनसुनावणीची रुपरेषा विषद करतांना सांगितले की, प्रथम प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार हे पॉवर पॉईंटव्दारे प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरणाची सद्यस्थिती त्यात जल, हवा, घन कचरा, घातक घनकचरा याबाबत विश्लेषण, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणारा संभाव्य आघात, त्यावरील उपाययोजना व प्रकल्पाचा पर्यावरणविषयक व्यवस्थापन योजना (Environment Management Plan) याबाबत संपूर्ण माहिती देतील. जनसुनावणी बैठकीत उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे उपरोक्त प्रकल्पाबाबत काही पर्यावरणीय आक्षेप,हरकती, सूचना असल्यास त्या तोंडी वा लेखी मांडण्याची संधी देण्यात येईल. उपस्थित त्यांचे आक्षेप,हरकती, सूचना लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. सूचना वा आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गावाचे नांव सांगावे, म्हणजे बैठकीच्या इतिवृतात त्यांची नोंद घेण्यात येईल. त्यानंतर मा. अध्यक्ष हे आपले मनोगत व्यक्त करतील व जनसुनावणी बैठकीचा समारोप करण्यात येईल. बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, उपस्थित करण्यात आलेले लेखी आक्षेपकांना कारखान्याने दिलेले स्पष्टीकरण हा संपूर्ण दस्तावेज शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल.

आयोजक, यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी प्रकल्पांचे तांत्रिक सल्लागार

यांना विनंती केली. त्यानंतर तांत्रिक सल्लागार यांनी प्रकल्पांविषयीचे संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजने बाबतचे सादरीकरण केले.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी अतिशय चांगल्या प्रकारे सादरीकरण केलेले आहे. पर्यावरणाच्यादृष्टीने सर्व मुद्दे स्पष्टपणे सादर केलेले आहेत, उपाययोजनाही सांगितलेल्या आहेत. तरी परिसरातील नागरिक जे उपस्थित आहेत, त्यांनी सदरहू प्रकल्पाबाबतच पर्यावरणाचे काही आक्षेप, सूचना, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित कराव्यात त्यापूर्वी त्यांनी आपले नांव व गावाचे नांव स्पष्टपणे सांगावे जेणे करुन त्याची इतिवृत्तांमध्ये नोंद घेता येईल.

<u>उपस्थितांनी चर्चेत भाग घेतला व त्यास पर्यावरण सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक / पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे खालील प्रमाणे.</u>

१) <u>श्री अनिल खाशाबा चव्हाण, राहणार-चिखलहोळ, तालुका- खानापूर, जिल्हा-सांगली.</u>

प्रश्न-

मी ऊस उत्पादक शेतकरी आहे. प्रकल्प विस्तारिकरणासाठी अतिरिक्त पाण्याची गरज भासेल. तरी अतिरिक्त पाण्याचा प्रकल्प प्रवर्तकांनी ऊपसा घेतल्यास त्यामुळे स्थानिक शेतक-यांना काही अडचणी निर्माण होतील काय?

<u>उत्तर-</u>

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की जरी प्रकल्प विस्तारिकरण होणार असले तरी औद्योगिक वापरासाठी अतिरिक्त पाणी घेण्यात येणार नाही. प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे. ऊसामध्ये ७०% पाणी असते. त्यातील २०% पाणी आपण कन्डेन्सेट करुन त्याची साठवण करण्यात येणार आहे. ते साठवण केलेले पाणी आपण ऊसाचा गळीत हंगाम बंद झाल्यानंतर आसवणी प्रकल्पासाठी वापरणार आहोत. त्यामुळे आपल्याला अतिरिक्त पाण्याची गरज लागणार नाही. स्थानिक शेतक-यांना त्यांच्या शेतीसाठी पाणी न मिळण्याचा त्रास होणार नाही व शेतीवर परिणाम होणार नाही.

२) <u>श्री संतोष चंद्रकांत चव्हाण, राहणार-चिखलहोळ, तालुका- खानापूर, जिल्हा-सांगली.</u>

प्रश्न-

मी ऊस उत्पादक शेतकरी आहे. विस्तारिकरण प्रकल्पात उत्पादन प्रक्रियेत कोळशाचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे होणारे प्रदूषण व उत्पन्न होणा-या राखेचे व्यवस्थापन कशा प्रकारे करण्यात येईल जेणेकरुन आजूबाजूच्या गावांना त्रास होणार नाही?

उत्तर-

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात वापरण्यात येणारा कोळसा हा आयात केलेलाच कोळसा असेल. प्रकल्पात २०० टीपीएच बॉयलर व ३० टीपीएच बॉयलर या दोन्ही बॉयलरसाठी एकत्रित ८० मिटर्सची चिमणी बसविण्यात येणार असून त्यास अत्यंत आधुनिक अशी इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर ही सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. ती ९९.९% कार्यक्षमता सिध्द करते. गोळा होणारी सर्व राख ही स्थानिक वीटभट्टांना वीट उत्पादनासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यामुळे आजूबाजूच्या गावांना राखेचा काहीही त्रास होणार नाही.

३) श्री अजित हणमंतराव देशमुख, राहणार § माहुली, तालुका- खानापूर, जिल्हा- सांगली.

प्रश्न-

प्रकल्प विस्ताकरिकरणासाठी अतिरिक्त पाणी उपलब्ध करावेच लागणार व अतिरिक्त पाण्यामुळे अतिरिक्त सांडपाण्याचीसुध्दा निर्मिती होईल. तरी सांडपाण्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल?

उत्तर-

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की साखर उत्पादन विभागात ३०३.० किलोलिटर प्रति दिन सांडपाणी निर्माण होईल. कार्यरत प्रकल्पात औद्योगिक सांडपाणी प्रकिया सयंत्रणा (Effluent Treatment Plant) अस्तित्वात असून तिचे अपग्रेडेशन/विकसन करण्यात येऊन तेथे रिव्हर्स ऑस्मोसिस सयंत्रणा (आर.ओ.सयंत्रणा) कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे ३०३.० किलोलिटर प्रतिदिन उत्पन्न होणा-या सांडपाण्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर होणार आहे. त्याचप्रमाणे विस्तारिकरणानंतर ८,००० किलोलिटर पाणी कन्डेन्सेट केल्यानंतर त्याच्या ३०% म्हणजे २,००० किलोलिटर प्रतिदिन अतिरिक्त सांडपाणी आपणास उपलब्ध राहिल. त्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रक्रियेसाठी पुनर्वापर करण्यात येणार आहे.

४) **<u>श्री सखाराम माने, राहणार- नागेवाडी तालुका- खानापूर, जिल्हा-सांगलीः-</u>**

<u>प्रश्न-</u>

आसवणी प्रकल्पातील बॉयलरमुळे राख तयार होणार, त्यामुळे कारखान्याच्या आजूबाजूतील परिसर व शेतकरी यांचे नुकसान न होण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती द्यावी.

<u>उत्तर-</u>

आसवणी प्रकल्पात बॉयलरमुळे जी राख निर्माण होईल, ती स्थानिक वीटभट्टी धारकांना वीट निर्मितीसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यामुळे तीची साठवणुक करण्यात येणार नाही. त्यामुळे राख वा-याने उडून जवळील शेतात जाऊन जवळील शेतीचे नुकसान/दुष्परिणाम अजिबात होणार नाही.

५) **<u>श्री रमेश मोहिते, राहणार-हिंगणगादे, तालुका-खानापूर, जिल्हा-सांगलीः-</u>**

<u>प्रश्न-</u>

प्रकल्पातील आसवणी विभागातील सांडपाण्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल?

उत्तर-

प्रकल्पात प्रथम एनॉरबिक डायजेस्टर कार्यान्वित करण्यात येईल. बायोगॅसची निर्मिती करण्यात येणार आहे, जो बायोगॅस आपण बॉयलरला वापरणार आहोत. स्पेंट वॉश (सांडपाणी) हे एमईई (मल्टी इफेक्टीव्ह ईव्हॅपरेटर) मध्ये एकत्रित (कॉन्सन्ट्रेट/Concentrate) करण्यात येऊन तो ड्रायरमध्ये वाळविण्यात येईल. त्यामुळे उरलेले घनपदार्थ (Solids) पोटॅश खत म्हणून वापरता य़ेतील. ते शेतीसाठी वापरता येते.

६) **<u>श्री बबनराव काळे, राहणार- तालुका-खानापूर, जिल्हा-सांगलीः-</u>**

<u>प्रश्न-</u>

येथे ज्या गोष्टीं सांगण्यात येतात, त्या प्रत्यक्ष झाल्या पाहिजेत. नाहीतर ओढ्यात पाणी सोडणे किंवा राख वा-याने उडणे ह्या गोष्टी होऊन त्याचा भयंकर त्रास आजूबाजूच्या शेतक-यांना होईल. तरी सर्व काळजी घेण्यात यावी, जेणेकरून आजूबाजूच्या शेतक-यांना काहीही त्रास होऊ नये.

<u>उत्तर-</u>

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सर्व पर्यावरण नियमांचे पालन करण्याचे अभिवचन दिले.

७) <u>श्री अमोल बाबूराव जानकर, राहणार-भिकवडी, तालुका-खानापूर, जिल्हा-सांगली.</u>

<u>प्रश्न-</u>

प्रक्रिया करण्यात आलेले पाणी हे जवळपासचे शेतकरी परत वापरु शकतील काय?

<u>उत्तर-</u>

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की उत्पन्न् होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे. सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प आहे.

८) <u>श्री सचिन शंकर माने, राहणार-साळशिंगे, तालुका-खानापूर, जिल्हा-सांगलीः-</u>

<u>प्रश्न-</u>

या प्रकल्पाच्या माध्यामातून गावक-यांना नोकरीची अपेक्षा आहे. तरी या प्रकल्पातून नोकरीची संधि मिळतील काय?

उत्तर-

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात स्थानिकांना नोकरीची संधि निश्चितच देण्यात येतील. साखर कारखाना प्रकल्प विस्तारिकरण व नविन सहविद्युत आणि आसवणी प्रकल्प स्थापनेमुळे ३६० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळू शकते. मात्र सदरहू प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर अप्रत्यक्ष रोजगारात व स्थानिक उद्योगात म्हणजे हॉटेल व्यवसाय, वाहतुक व भाजीपाला व्यवसाय, दुकाने व इतर अनेक पुरक व्यवसायात प्रचंड वाढ होऊन कित्येक हजारो लोकांना त्याचा फायदा निश्चितच होईल.

९) <u>श्री तात्या विकास नवले, राहणार § नागेवाडी, तालुका-खानापूर, जिल्हा-सांगलीः-</u>

<u>प्रश्न-</u>

प्रकल्पासाठी किती पाणी लागेल व त्यामुळे किती जास्त प्रमाणात सांडपाण्याची निर्मिती होईल.

<u>उत्तर-</u>

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की संपूर्ण प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर १०० किलो लिटर प्रतिदिन पाण्याची गरज भासणार असून एकूण ४२३.० किलोलिटर सांडपाण्याची निर्मिती होईल. मात्र आधुनिक प्रक्रिया सांडपाण्यावर करण्यात येणार असल्याने सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निस्सारण म्हणजे झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असेल.

१०) **श्री राजेन्द्र तुकाराम पाटील, राहणार-वीटा, तालुका-खानापूर, जिल्हा-सांगलीः-**

प्रश्न-

प्रकल्प विस्तारिकरणासाठी बॉयलरची क्षमता वाढविण्यात येणार आहे. तरी उत्पन्न होणा-या राखेच्या व्यवस्थापनाची माहिती द्यावी.

उत्तर-

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की बॉयलरची क्षमता वाढवून त्यासाठी इंधन म्हणून बगॅस किंवा कोळसा आणि बायो-गॅस वापरण्यात येणार आहे. त्यामुळे ६६६.० मेक्ट्रीक टन प्रतीमास राख तयार होईल. ही राख स्थानिक वीटभट्टीधारकांना वीटनिर्मितीसाठी देण्यात येणार आहे. ७०% माती व ३०% राख ह्याप्रमाणे त्याचा वापर करण्यात येईल. त्यामुळे स्थानिकांना राखेचा काहीही त्रास होणार नाही.

११) **श्री महेश पोपट निकम, राहणार-नागेवाडी, तालुका-खानापूर, जिल्हा-सांगलीः-**

प्रश्न-

प्रकल्प विस्तारिकरण हाती घेतलेले आहे, ते कारखान्याच्या प्रगतीसाठी निश्चितच चांगले आहे. मात्र या प्रकल्पामुळे शेतक-यांच्या ऊसाच्या भावात काही बदल होईल काय?

उत्तर-

प्रकल्प प्रवर्तक यांनी सविस्तर माहिती देताना सांगितले की आता फक्त साखर निर्मिती विभाग चालू आहे. आसवणी व सहविद्युत प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर आपल्याला अतिरिक्त उत्पन्न् मिळू शकते. त्या अतिरिक्त उत्पन्नामुळे ऊसाला अतिरिक्त ४५०-५०० रुपये जास्त भाव देता येऊ शकेल. भारत सरकारने आताच घेतलेल्या निर्णयानुसार ऊसाच्या रसापासून जे इथेनॉल तयार करण्यात येईल, ते दहा वर्षे विकत घेण्याची तयारी केंद्र सरकारने घेतलेली आहे. त्याचे दरही आता निश्चित करण्यात आलेले आहेत.

त्याचप्रमाणे आपण प्रकल्पात कार्यरत असलेल्या बॉयलरच्या सहाय्याने आपण वीज सहविद्युत प्रकल्पात तयार करणार असून ती वीज महाराष्ट्र शासनाच्या विद्युत मंडळास विकू शकतो. त्यातूनही आपणास अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. त्यामुळे फक्त साखरेपासून मिळणा-या उत्पन्नापेक्षा निश्चितच दोन्ही प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर जास्त उत्पन्न् मिळेल. त्यामुळे ऊसाच्या दरामध्ये निश्चितच बदल होतील.

१२) **श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, अध्यक्ष, धरित्री पर्यावरण परिरक्षणा संस्था, जिल्हा-नालगोंडा, तेलंगणा राज्यः-**

श्री सुनंदा रेड्डी यांनी प्रथम साखर कारखाना प्रकल्प विस्तारीकरण व नविन आसवणी व सहविद्युत प्रकल्प स्थापनेबद्दल प्रकल्प प्रवर्तकांचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की भारतात १८ ते ३५ वयातील ४० कोटी तरुण व तरुणी नोकरीच्या शोधात आहेत. त्यासाठी औद्योगिक प्रगती आवश्यक आहे, त्याचप्रमाणे पर्यावरण संरक्षण व संवर्धन होण्याचीही आवश्यकता आहे. त्यांनी त्यासाठी विविध उपाय अंगिकारण्याची मागणी केली. त्यात प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील जनतेची आरोग्याची सद्यस्थिती, पीक उत्पादनाची सद्यस्थिती व भूगर्भातील पाण्याची सद्यस्थिती याचा अहवाल तयार करण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे पावसाचे पाणी साठवण्यासाठी मोठी साठवण टाकी बांधण्याची मागणी केली व पावसाळा संपल्यानंतर त्या साठवण टाकीतीलच पाणी वापरण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे हरितपट्टा विकसित करताना स्थानिक फळ झाडे व औषधी वनस्पती लागवड करण्याची मागणी केली.

श्री रेड्डी यांनी प्रकल्पात स्थानीक युवकांना रोजगार देण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे स्थानिक युवक व युवतींसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याची मागणी केली. जपान व कोरिया या देशात ९६% तरुण तरुणींना कौशल्यविकास प्रशिक्षण दिले जाते, तर भारतात फक्त ५-६% तरुण तरुणींनाच संधि मिळते असे त्यांनी सांगितले. त्यांनी ठिबक सिंचन योजनेस प्रोत्साहन देण्याची मागणी केली व पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस प्रकल्पास विनाअट परवानगी देण्याची विनंती केली. त्यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी तयार केलेल्या संपूर्ण पर्यावरण अहवालाबाबत पर्यावरण सल्लागार संस्थेचे अभिनंदन केले. त्यांनी त्यांचे निवेदन लेखी स्वरुपातही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस सादर केले.

पर्यावरण सल्लागार यांनी श्री रेड्डी यांचे आभार मानले.

१३) <u>श्री रमेश सुर्यवंशी, राहणार-हिंगणगादे, तालुका-खानापूर, जिल्हा-सांगली.</u>

<u>प्रश्न-</u>

प्रकल्प विस्तारिकरणामुळे स्थानिक शेतक-यांचा ऊस हा पूर्णपणे वापरला जाईल. त्यामुळे त्यांचे नुकसान होणार नाही. प्रकल्पात औद्योगिक सांडपाणी व हवेचे जे प्रदूषण होते, त्यावर देखभाल ही कशी करण्यात येते? प्रदूषण नियंत्रण मंडळ हे कसे नियंत्रण ठेवते याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

<u>उत्तर-</u>

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ हे वेळोवेळी प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची तपासणी करण्यासाठी भेट देतात. त्याचप्रमाणे निर्देशांनुसार, प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरींग सयंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली असून त्याचा एक संपर्क मुंबईतील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुख्यालयात तर नवी दिल्ली येथे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयात असतो. त्यामुळे आपले प्रदूषण नियंत्रण सयंत्रणांचे कार्य हे तेथून प्रत्यक्ष पाहात असतात. त्यांचे सतत लक्ष (Live Vigilance) असते आणि मानकांत काही बदल आढळल्यास त्वरित कारखान्यास सूचना देण्यात येऊन स्पष्टीकरण मागविण्यात येते.

१४) <u>श्री सुदर्शन, पर्यावरणवादी स्वंयसेवी संस्था.</u>

त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले.

१५) <u>श्री विजय जगताप, माहुली, तालुका-खानापूर, जिल्हा-सांगली.</u>

<u>प्रश्न-</u>

आसवणी प्रकल्पातील सांडपाण्यास वास येतो, त्याबाबत काय उपाययोजना करण्यात येणार आहेत?

<u>उत्तर-</u>

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की वास न येण्यासाठी आसवणी प्रकल्पातील सांडपाणी हे सात दिवसांपेक्षा जास्त दिवस साठवून ठेवण्यात येणार नाही. त्यामुळे परिसरात नागरिकांना वासाचा उपद्रव होणार नाही.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की मे. यशवंत शुगर आणि पॉवर प्रायव्हेट लिमिटेड, नागेवाडी, तालुका-खानापूर, जिल्हा-सांगली यांच्या प्रस्तावित ऊस गाळप विस्तारिकरण क्षमता २,५०० टन प्रतिदिन ते ८,००० टन प्रतिदिन, नविन ४० मेगावॅट सहविद्युत प्रकल्पाची स्थापना व नविन ११० केएलपीडी आसवणी क्षमता, ११० केएलपीडी रेक्टीफाईड स्पिरिटचे उत्पादन करण्यासाठी / ११० केएलपीडी इ.एन.ए./ १०५ केएलपीडी इथेनॉल आधारित सी / बी हेवी मोलॅसिस / ऊसाचा रस (शुगर केन ज्यूस) / एकवटलेला ऊसाचा रस (Concentrated Juice) सायरप / धान्य (ग्रेन्स) बाबत जनसुनावणी

सूचना स्थानिक व राष्ट्रीय वृत्तपत्रात जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर प्रकाशित करण्यात आलेली होती. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, सांगली यांना सुनावणीच्या दिवशी स्वंयसेवी संस्थांकडून काही सूचना, आक्षेप प्राप्त झालेले असून त्यापैकी मा. आमदार अनिलभाऊ बाबर, विधानसभा सदस्य, विटा, ता. खानापूर. जि.सांगली यांचा लेखी तक्रार/आक्षेप सुनावणीपूर्वी प्राप्त झालेला आहे. सदरील तक्रार/आक्षेप या इतिवृत्तांसोबत **अनुक्रमांक-अ,** अन्वये जोडत आहोत. प्रकल्प प्रवर्तक यांनी सदर तक्रार/आक्षेपच्या अनुषंगाने लेखी खुलासा सादर केलेला असून तो या इतिवत्तांसोबत **अनुक्रमांक-ब,** अन्वये जोडण्यांत आला आहे. या व्यवतिरिक्त इतर प्राप्त झालेले आक्षेप व स्पष्टीकरण हे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत भारत सरकारला सादर करण्यात येईल. आयोजक यांनी सांगीतले की, आजच्या जनसुनावणीत उपस्थितांनी त्यांच्या शंका, सूचना, आक्षेप, नोंदी तोंडीस्वरुपात मांडल्या असून त्याची व प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी दिलेले स्पष्टीकरण यांचीही इतिवृतात नोंद होईल.

आयोजक यांनी मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना मनोगत व्यक्त करण्याची विनंती केली.

मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मनोगत व्यक्त केले की मे. यशवंत शुगर आणि पॉवर प्रायव्हेट लिमिटेड, नागेवाडी, तालुका-खानापूर, जिल्हा-सांगली यांच्या प्रस्तावित विस्तारिकरण व नविन प्रकल्पाबाबत जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. पर्यावरण सल्ल्गार यांनी पर्यावरण आघाताबाबत योग्य माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थितांना दिलेली आहे. उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्न, शंका यांना पर्यावरण सल्लागार यांनी उत्तरे दिलेली आहेत. त्याची नोंद इतिवृतात घेण्यात येईल. तसेच काही लेखी सूचना, आक्षेप प्राप्त झालेले असून त्याची व प्रकल्प प्रवर्तकांचे स्पष्टीकरण याची नोंद इतिवृतान्तात घेण्यात येईल. तरी कोणातीही काही शंका असल्यास ती उपस्थित करण्यात याव्यात, अन्यथा, ह्या जनसुनावणीचा समारोप करण्यात येईल. यावेळी भेंडवडे गावामधील एक रहिवाशी, यांनी सूचना उपस्थित केली की स्थानिकांच्या मनात प्रकल्प विस्तारिकरण व नविन प्रकल्प स्थापनेनंतर ऊसाला किती भाव देण्यात येईल, पैसे किती मिळणार, कधी मिळणार हाच मुद्दा आहे.

यावर मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी असून ऊसाच्या भावाबाबत आपणास काही माहिती हवी असल्यास आपण याबाबत सक्षम प्राधिकरण असलेल्या साखर आयुक्तालयाकडे विचारणा करु शकता.

शेवटी श्री. नवनाथ सं. अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी, सांगली तथा आयोजक पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी यांनी समितीचे मा. अध्यक्ष, सदस्य तसेच सर्व उपस्थित नागरीक, कारखान्यांचे पदाधिकारी, तात्रिक सल्लागार व प्रकल्प प्रवर्तक यांनी केलेल्या सहकार्याबददल आभार मानुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने आजची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

उपरोक्त सुनावणीची कार्यवाही सकाळी १२-३० वाजता सुरु होवून दुपारी ०२ ३० वाजता समाप्त झाली.

(नवनाथ अवताडे)
आयोजक तथा
उप प्रादेशिक अधिकारी,म. प्र. नि.मंडळ
सांगली.

(रविंद्र आंधळे)
सदस्य तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ
कोल्हापूर.

(डॉ. अभिजीत चौधरी,भाप्रसे)
अध्यक्ष,
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
सांगली.